# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.१२ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## उत्तनमध्ये आढळला जिवंत तोफगोळा; पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- भाईंदर पश्चिमेतील उत्तन परिसरात जमिनीत पुरलेला जुन्या काळातील जिवंत तोफगोळा आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती. मात्र, मिरा-भाईंदर पोलिस आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या संयुक्त कारवाईत हा तोफगोळा सुरक्षितपणे निकामी करण्यात आला. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली आहे.

उत्तन परिसरातील नागरिकांना जमिनीत गाडलेला संशयास्पद धातूचा गोळा आढळून आला. त्यांनी तत्काळ याची माहिती पोलिसांना दिली. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी प्राथमिक पाहणी केल्यानंतर ती वस्तू अविस्फोटित स्फोटक सामग्री असण्याची शक्यता व्यक्त केली. कोणताही धोका न पत्करता पोलिसांनी तातडीने एनएसजीशी संपर्क साधला.एनएसजीचे पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर परिसर सुरक्षित करण्यात आला.

बुधवारी सायंकाळी सुमारे चारच्या सुमारास विशेष तांत्रिक प्रक्रियेच्या माध्यमातून हा तोफगोळा निकामी करण्यात आला. तपासाअंती ही सामग्री अविस्फोटित तोफगोळा असल्याचे स्पष्ट झाले. या संपूर्ण कारवाईदरम्यान सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले असून कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. क्षमता विकास उपक्रमांतर्गत मिरा-भाईंदर पोलिसांना नुकतेच आयईडी आणि विविध प्रकारच्या स्फोटकांची ओळख पटविण्याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. याच प्रशिक्षणाच्या आधारे पोलिसांनी वेळीच धोका ओळखून योग्य ती पावले उचलल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# पश्चिम आशियातील तणाव अत्यंत धोकादायक वळणावर

### अमेरिकेचे इराणवर ४९ क्षेपणास्त्रांचे हल्ले, प्रत्युत्तरात इराणने अमेरिकेचे १९ लष्करी तळ उडवले, होर्मुझची सामुद्रधुनीही केली बंद

वॉशिंग्टन दि.११ (वृत्तसंस्था)- पश्चिम आशियातील तणाव आता अत्यंत धोकादायक वळणावर पोहोचला असून, अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा युद्ध पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर अमेरिकन सैन्याने इराणवर भीषण क्षेपणास्त्र हल्ले केले. या कारवाईला चोख प्रत्युत्तर देत इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड्स कोरने बहरीन, कुवेत आणि इराक मधील अमेरिकेच्या तब्बल १८ लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे जोरदार मारा केला आहे. या अभूतपूर्व संघर्षामुळे इराणने जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली होर्मुझची सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या जहाजांसाठी पूर्णपणे बंद करण्याची घोषणा केली आहे.

मंगळवारी इराणने अमेरिकेचे एक हेलिकॉप्टर पाडल्यानंतर दोन्ही देशांमधील संघर्ष तीव्र झाला. अमेरिकन सेंट्रल कमांडने बुधवारी स्वसंरक्षणासाठी इराणच्या अनेक तळांना लक्ष्य केले. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतः या माहितीला दुजोरा दिला असून, ''अमेरिकेने टॉमहॉक क्षेपणास्त्रांसह एकूण ४९ क्षेपणास्त्रांद्वारे इराणच्या महत्त्वाच्या भागांवर हल्ले केले आहेत,'' असे सांगितले. तसेच इराणच्या नेत्यांनी शांतता करारासाठी खूप उशीर केल्याचा आरोप करत, जर करार केला नाही तर हा शस्त्रसंधी मोडून याहून मोठे हल्ले केले जातील, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसथ यांनीही इराणच्या महत्त्वपूर्ण केंद्रांवर बॉम्ब टाकले जातील, असा इशारा दिला आहे.

अमेरिकेने इराणवरील हल्ल्यासंदर्भात एक मोठे निवेदन जारी केले आहे. ११ जूनच्या रात्री म्हणजेच आज इराणवर मोठा हल्ला केला जाईल असं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांनी हल्ल्याच्या काही तास आधीच ही धमकी दिली आहे. त्यांनी आपल्या सोशल मीडियात हल्ल्याबाबत पोस्ट केली आहे.

या पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलंय की, अमेरिका आज रात्री इराणवर एक मोठा हल्ला करेल. इराणचे नौदल, हवाई दल, रडार, एंटी एअरक्राफ्ट आणि संरक्षण यंत्रणेसह त्यांची बहुतेक हल्ला करण्याची क्षमता नष्ट करण्यात आली आहे. नजीकच्या



भविष्यात आम्ही खार्ग बेट आणि इतर तेल-संबंधित पायाभूत सुविधा ताब्यात घेऊ आणि त्यांच्या तेल आणि गॅस बाजारावर पूर्ण नियंत्रण मिळवू असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. जसं आम्ही व्हेनेझुएलासोबत केले त्यामुळे व्हेनेझुएल ा आणि अमेरिका या दोघांसाठीही खूप फायदेशीर ठरत आहे असं ट्रम्प यांनी म्हटलं.

अमेरिकेच्या या हल्ल्यासमोर न झुकता इराणने काही तासांतच भीषण प्रतिहल्ला चढवला. इराणच्या अधिकृत वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, इराणने बहरीनमधील अमेरिकेच्या पाचव्या नौदल ताफ्याच्या पॅट्रियट प्रणालीचे रडार आणि संप्रेषण अँटेना उद्ध्वस्त केले आहेत. याशिवाय, कुवेतमधील अली अल सलेम आणि अहमद अल जुबेर एअरबेस, बहरीनचा शेख ईसा हवाई तळ आणि इराकच्या इरबिलमधील एअरबेससह एकूण १८ तळांवर इराणच्या जॉइंट मिलिटरी कमांडने मोठा मारा केला. या हल ्ल्यानंतर कुवेत, बहरीन आणि जॉर्डनमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, कुवेतमध्ये धोक्याचे सायरन वाजवण्यास सुरुवात झाली आहे. बहरीनच्या गृह मंत्रालयाने नागरिकांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले आहे. (पान ४ वर)

## दिपके यांची मोदींबरोबर बैठक; संजय राऊत यांचा दावा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्याबाबत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी खळबळजनक दावा केला. अमेरिकेतून भारतात येण्यापूर्वी अभिजीत दिपके यांची पंतप्रधान मोदींबरोबर बैठक झाली आणि त्याचे फोटो आपल्याकडे असल्याचा आरोप राऊत यांनी केला. आम्ही त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला, मात्र जी काही माहिती या सगळ्यासंदर्भात समोर येत आहे, ती माध्यमांसमोर मांडणे आवश्यक आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता त्या आंदोलनाला गेला नाही. तरुणांचे प्रश्न आणि तरुणांना आम्ही पाठिंबा दिला, असेही राऊत म्हणाले. दरम्यान अभिजीत दिपके यांनी संजय राऊत यांचा आरोप फेटाळून लावला असून तो एआयद्वारे तयार केला असल्याचे म्हटले आहे. पंतप्रधान मोदी यांना एवढी सुरक्षा असते. सहज जाऊन भेटणे अशक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## भारतीय जहाजावर अमेरिकन नौदलाचा हल्ला

### भारताने अमेरिकेच्या राजदूतांना फटकारले

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- ओमानजवळ भारतीय खलाशी असलेल्या जहाजांवर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांविरोधात भारताने तीव्र निषेध नोंदवला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, अमेरिकेच्या नौदलाने भारतीय कर्मचारी असलेल्या एमटी जलवीर या तिसऱ्या जहाजावरही हल्ला केला. जहाजावरील सर्व २० भारतीय सुरक्षित असून, त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वी, एमटी सेट्टेबेलो आणि एमटी मेरीवेक्स या जहाजांवरही हल्ला झाला होता, ज्यात आतापर्यंत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, या तिन्ही जहाजांवर अमेरिकेच्या नौदलाने हल्ला केला होता. भारताने अमेरिकेच्या राजदूतांना बोलावून जहाजांवरील हल्ले तत्काळ थांबवण्याची मागणी करत तीव्र निषेध नोंदवला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनेही या तीन जहाजांवरील हल्ल्यांची दखल घेतली आहे. सरकारने सांगितले की, सध्या आखाती प्रदेशात १३ भारतीय ध्वज असलेली जहाजे आणि १८,००० हून अधिक भारतीय खलाशी आहेत, त्यापैकी ५६२ भारतीय जहाजांवर तैनात आहेत.

ओमानच्या किनाऱ्याजवळ सेट्टेबेलो या तेलवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी भारताने अमेरिकेविरोधात तीव्र निषेध नोंदवला आहे. भारतीय सरकारने आपली चिंता व्यक्त करण्यासाठी आणि भारतीय खलाशांची सुरक्षा सर्वोच्च प्राधान्याची बाब असल्याचे सांगण्यासाठी, अमेरिकी दूतावासाचे प्रभारी जेसन मीक्स यांना परराष्ट्र मंत्रालयात बोलावले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, या हल्ल्यानंतर भारताने अमेरिकेकडे औपचारिक निषेध नोंदवला आहे. त्यांनी सांगितले की, मोठ्या संख्येने भारतीय खलाशी जगभरात, विशेषतः पर्शियन आखात आणि पश्चिम आशियामध्ये काम करतात. त्यामुळे, त्यांची सुरक्षा भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

## एसटीच्या बैठकीत जोरदार राडा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत सुरु असलेली एसटी महामंडळाची बैठक वादळी ठरल्याचं समोर आलं आहे. आमदार सदाभाऊ खोत आणि आमदार गोपीचंद पडळकर यांनी महामंडळाच्या बैठकीत एसटीचे एमडी डॉ. माधव कुसेकर यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. चर्चा सुरु असताना सदाभाऊ खोत आणि गोपीचंद पडळकर एमडींच्या अंगावर धावून गेल्याचं समोर आलं आहे. मात्र, मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेल्या मध्यस्थीमुळं मोठा अनर्थ टळला. याशिवाय या बैठकीतून बाहेर पडल्यानंतर सदाभाऊ खोत यांनी एसटीचे एमडी आणि मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर टीका केली. तर, याच बैठकीतून कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत फोनवरुन चर्चा साधली.

एसटी महामंडळाच्या बैठकीत आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. चर्चा करत असताना दोघेही एसटीचे एमडी डॉ. माधव कुसेकर यांच्या अंगावर धाऊन गेले. मात्र, मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मध्यस्थीमुळे अनर्थ टळला. गोपीचंद पडळकर आणि सदाभऊ खोत यांनी एमडींवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. एमडी यांना बैठकीतून बाहेर काढा असा आग्रह गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी केला होता. (पान ४ वर)

## भाजपला रोखण्यासाठी देशात महिला पंतप्रधान चेहरा जाहीर करा, चमत्कार घडेल

### भास्कर जाधव यांचे भुवया उंचावणारे वक्तव्य

चिपळूण दि.११ (प्रतिनिधी)- ''देशातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता आणि भाजपला सक्षम शह देण्यासाठी आता विरोधी पक्षांनी पंतप्रधानपदासाठी एखाद्या महिलेचे नाव समोर आणण्याची गरज आहे. जर महिला पंतप्रधान म्हणून नाव जाहीर झाले, तर देशाच्या राजकारणात मोठा चमत्कार झाल्याशिवाय राहणार नाही,'' असे मोठे आणि खळबळजनक विधान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आमदार भास्कर जाधव यांनी केले आहे. ''मला महिला पंतप्रधान म्हणून एक चेहरा दिसतोय, मात्र त्याबद्दल मी आताच बोलणे योग्य नाही,'' असे म्हणत त्यांनी सस्पेन्स वाढवला आहे. चिपळूण येथे आयोजित पत्रकार परिषदेत भास्कर जाधव यांनी देशातील वाढती महागाई, बेरोजगारी आणि महायुतीमधील अंतर्गत वादावर बोट ठेवत केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

महाराष्ट्रातील महायुतीच्या राजकारणावर बोलताना जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या परिस्थितीवर टोमणा मारला. ''बंडखोर उभे करणे ही भाजपची जुनीच रीत आहे. जिथे जिथे एकनाथ शिंदेंना उमेदवारी देण्यात आली, तिथे तिथे भाजपने आपले बंडखोर उमेदवार उभे केले आहेत. एकनाथ शिंदे यांना १७ पैकी १० जागा पाहिजे होत्या, पण त्यांच्या पदरात केवळ ४ जागा पाडल्या गेल्या. आता शिंदेंचा उमेदवार निवडून आला तर ते आमच्यामुळेच आला, असा दावा भाजप करेल,'' अशी घणाघाती टीकाही भास्कर जाधव यांनी शेवटी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान राहण्याचा पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मोडल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. यावर अभिनेते राजेश खन्ना यांचा प्रसिद्ध डायलॉग मारत भास्कर जाधव यांनी टोला लगावला. ''बाबू मोशाय, जिंदगी बडी होनी चाहिये... लंबी नही! दिवस मोजून कोणाचे कर्तृत्व सिद्ध होत नाही. खुर्चीवर किती दिवस बसलो याचा आनंदोत्सव साजरा करण्यापेक्षा, आपल्या कारकिर्दीत देशवासीयांना काय सुख आणि आनंद दिला याचे मूल्यमापन पंतप्रधान आणि सरकारने करावे,'' अशी टीका जाधव यांनी केली.

पंतप्रधानांच्या कार्यकाळाच्या विक्रमावर आक्षेप घेताना जाधव म्हणाले, ''पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९४७ मध्ये देशाचा ध्वज फडकवला, तेव्हापासूनचे त्यांचे दिवस मोजले जातात. इंदिरा गांधी देखील मोदींपेक्षा जास्त काळ पंतप्रधान राहिल्या आहेत, मात्र त्या सलग राहिल्या नसल्याने भाजप त्यांचे दिवस मोजत नाही. सलग हा शब्द केवळ भाजपच्या सोयीचा आहे. वास्तविकता पाहता नेहरू आणि गांधी यांच्यापेक्षा मोदींचा पंतप्रधान म्हणून एकूण कार्यकाळ जास्त नाही. देवेंद्र फडणवीस यांनी जाहिरातींच्या माध्यमातून मोदींच्या कामाचा लेखाजोखा मांडला, पण त्याचा खरा डेटा लोकांसमोर आणलाच नाही.''

## कुंभार समाजाला वर्षाला ७०० ब्रासपर्यंत वाळू अन् माती मिळणार मोफत, राज्य सरकारचा निर्णय

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राज्यातील कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा घेतला आहे. कुंभार समाज, मूर्तीकार आणि विटा बनविणाऱ्या कारागिरांना आता वर्षाला तब्बल ७०० ब्रासपर्यंत उपयुक्त माती आणि वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

विटा, कौले, मडकी व इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाळूवर आता कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. आवश्यक परवानगी घेतल्यानंतर कारागिरांना स्वखर्चाने समुद्राच्या तळातून, नदी, नाले आणि खाडी पात्रातून ही वाळू वाहून नेण्याची मुभा असेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

कुंभार समाजाची ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत समाजाला आश्वासन दिले होते. त्यानुसार मध्य प्रदेशमधील धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही नवीन योजना लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे कच्च्या मालाच्या वाढत्या खर्चामुळे अडचणीत आलेल्या पारंपरिक माती उद्योगाला मोठा दिलासा मिळणार आहे.

हा निर्णय तातडीने आणि सुलभतेने लागू व्हावा यासाठी महसूल (पान ४ वर)

## शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यात 'कॉकरोच जनता पार्टी'चे आंदोलन

पुणे दि.१ (पतिनिधी)- दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनानंतर 'कॉ करोच जनता पार्टी' आता पुण्यात आंदोलन करत आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी सोशल मीडियाद्वारे याबाबत माहिती दिली. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले असून, मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी आंदोलनासाठी जमलेल्या विद्यार्थ्यांनी विविध अशयांचे पोस्टर्स सोबत आणले होते. एका पोस्टरवर लिहिले होते, 'देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र आणि पेपर फोडण्यात धर्मेंद्र'. एकूणच विद्यार्थ्यांकडून चांगलाच प्रतिसाद या आंदोलनाला मिळत असल्याचे दिसत आहे.

यावेळी बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांना या लोकांमुळे आत्महत्या करावी लागली आहे. तरी सुद्धा हे लोक बिनलाजासारखे खुर्चीला चिटकून बसले आहेत. या सिस्टममुळे या विद्यार्थ्यांना जीव द्यावा लागला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यावर सरकारने कारवाईमध्ये बदली केली आहे, राजीनामा घेऊ शकले नाहीत.

यानंतर अभिजीत दिपके यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, मला जरी अटक झाली तरी चालेल कारण मला माहीत होते की तुम्ही लोक हे आंदोलन पुढे चालवणार. तुमच्या शक्तीमुळेच मला हे लोक अटक करू शकले नाहीत. मी जेव्हा अमेरिकेतून निघालो तेव्हा माझी आई खूप रडली. जेवढी मी अमेरिकेला जाताना रडली नव्हती. कारण तिला (पान ४ वर)

## ट्रम्प सरकार विरोधात पर्यावरणवादी कोर्टात

मॅकॲलेन (अमेरिका) दि.११ (वृत्तसंस्था)- एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीला टेक्सासमधील वन्यजीव अभयारण्यातील ७०० हून अधिक एकर जमीन हस्तांतरित करण्याच्या निर्णयाला पर्यावरणवादी संघटनांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. या निर्णयामुळे आधीच स्पेसएक्सच्या रॉकेट प्रकल्पांमुळे बदललेल्या गल्फ किनारपट्टीवरील पर्यावरणीय धोक्यांमध्ये आणखी वाढ होईल, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. अमेरिका मासे आणि वन्यजीव विभागाने या महिन्याच्या सुरुवातीला स्पेसएक्ससोबत जमीन अदलाबदलीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. या करारानुसार स्पेसएक्सकडील ६८३ एकर जमीन सरकारकडे दिली जाणार असून त्याबदल्यात कंपनीला लोअर रिओ ग्रांडे व्हॅली नॅशनल वाइल्डलाइफ रिफ्यूजमधील ७०० हून अधिक एकर जमीन मिळणार आहे. हे अभयारण्य सुमारे १.०३ लाख एकर क्षेत्रात पसरलेले असून टेक्सास-मेक्सिको सीमेलगतच्या चार काउंटींमध्ये विस्तारलेले आहे. येथे अनेक दुर्मिळ प्राण्यांची अधिवासस्थाने आणि ऐतिहासिक वारसा स्थळे आहेत. नकाशांनुसार स्पेसएक्सला मिळणारी जमीन कंपनीच्या प्रक्षेपण केंद्राजवळ आहे. त्यामुळे भविष्यातील विस्तार आणि रॉकेट प्रक्षेपण सुविधा वाढवण्यासाठी कंपनीला मोठा फायदा होऊ शकतो. पर्यावरणवादी संघटनांच्या मते, या भागातील सरकारी जमीन खासगी कंपनीला देण्याचा हा पहिलाच प्रकार आहे.

## यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असेल तर विचार केला जाईल; सुनेत्रा पवारांचा नेत्यांना इशारा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी नेत्यांना गंभीर इशारा दिला आहे. आतापर्यंत जे काही घडलं ते समजून घेतलं, यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असेल तर त्याचा नक्कीच विचार केला जाईल, अशा शब्दात सुनेत्रा पवारांनी इशारा दिला. प्रत्येक कार्यकर्त्याची निष्ठा, काम आणि समर्पण माझ्या लक्षात आहे. योग्य वेळी त्याला न्याय आणि संधी मिळणार याची खात्री देते, असं आश्वासनही सुनेत्रा पवारांनी दिलं.

राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या भविष्यातील वाटचालीची दिशा स्पष्ट केली. पक्षहिताला सर्वोच्च प्राधान्य देत अजितदादा ज्या प्रमाणे कठोर निर्णय घ्यायचे त्याप्रमाणे निर्णय घेतले जातील असं त्या म्हणाल्या.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, ''पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा खांद्यावर घेताना मला सगळ्याची जाणीव होती. मी पक्षाला सर्वोच्च प्राधान्य दिलं. आतापर्यंत पक्षामध्ये जे घडलं, प्रत्येकवेळी मी सर्वांना समजून घेतलं, सावरून घेतलं. दादांनी त्यांच्या हयातीत कार्यकर्त्यांना समजून घेतलं, त्यांचा हट्ट पुरवला. त्यांना मान सन्मान दिला, पदं दिली. जे काही मागितलं ते देण्याचा प्रयत्न केला. यापुढे पक्षहिताला सर्वोच्च प्राधान्य दिलं जाईल, कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असेल तर नक्कीच विचार केला जाईल.''

दादा ज्या प्रमाणे पक्षहितासाठी कठोर निर्णय घेत, तसेच निर्णय घेतले जातील. ते माझ्या स्वभावाला जड जाईल, पण दादांच्या पावलावर पाऊल ठेवण्यासाठी प्रयत्न केला जाईल. मला खात्री आहे, पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी हे पक्षहिताच्या निर्णयामध्ये माझी साथ देतील, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. पक्षाची होणारी बदनामी माझ्यासह आपल्या सर्वांचीच आहे. मला या संदर्भामध्ये कठोर भूमिका घेण्याची वेळ येणार नाही याची सर्वांनीच खबरदारी घ्यावी, असंही त्या म्हणाल्या.

## सुनेत्रा पवारांच्या विमानात तांत्रिक बिघाड; सुप्रिया सुळेंकडून चिंता व्यक्त

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अभिजीत दिपके यांच्यातील कथित भेट तसेच सुनेत्रा पवार यांच्या विमान प्रवासादरम्यान झालेला तांत्रिक बिघाड, या दोन्ही चर्चिलेल्या मुद्द्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. 'सुनेत्रा वहिनींनी प्रवास केलेल्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती जर खरी असेल, तर मला नक्कीच वहिनींची, पार्थची आणि तटकरेंची काळजी वाटते,' असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी कौटुंबिक संवेदनशीलता दाखवली. तसेच संजय राऊतांनी स्थानिक पक्षांच्या काँग्रेसमध्ये विलिनीकरण करण्याच्या सल्ल्ल्यावरही सुप्रिया सुळे यांनी मोठे विधान केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांनी मुंबईहून दिल्लीला जाताना 'व्हीएसआर ऑपरेटिंग कंपनी'च्या विमानाने प्रवास केल्याचे वृत्त समोर आले होते. या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने उड्डाणाला दोन तास उशीर झाला होता. भूतकाळात अजित पवार यांचा याच कंपनीच्या एका (पान ४ वर)

## पंतप्रधान मोदींचा १२ वर्षांचा कार्यकाळ देशाला मागे नेणारा-हर्षवर्धन सपकाळ

बुलढाणा दि.११ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १२ वर्षांचा कार्यकाळ हा देशाला अत्यंत चुकीच्या दिशेने घेऊन जाणारा काळ म्हणून नोंदवला जाईल. त्यांच्या कार्यकाळात देशात कोणताही वास्तविक विकास झाला नाही, उलट देशावरील कर्ज वाढले आणि देश मागे पडला आहे, अशी टीका काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. पंतप्रधान मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळावर निशाणा साधताना त्यांनी, पंतप्रधानांनी आपल्या चुका सुधाराव्यात आणि देवाने त्यांना सुबुद्धी द्यावी, हीच या १२ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्याबद्दल त्यांना शुभेच्छा आहे, असा खोचक टोलाही लगावला. तसेच, ''या पनौतीचे राज्य जाऊन देशात बळीराजाचे राज्य यावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, २०१४ मध्ये सत्तेत येण्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी जनतेला मोठी आश्वासने दिली होती, परंतु त्यातील एकही आश्वासन पूर्ण झालेले नाही. तरुणांना रोजगार मिळाला नाही, नागरिकांच्या खात्यात पैसे आले नाहीत, स्मार्ट सिटी झाल्या नाहीत आणि शेतकऱ्यांचाही कोणताही फायदा झाला नाही. उलट देशात दहशतवाद वाढला असून, आपण कोणाकडून काय खरेदी करावे हेसुद्धा आपण ठरवू शकत नाही, हे पंतप्रधान मोदींचे मोठे अपयश आहे. जिंकणाऱ्या



सैन्याला अमेरिका माघार घ्यायला लावते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. सरकारच्या मेक इन इंडियाचा सिंह आज भंगारात गेला असून, युवकांना नोकऱ्या नसल्याने सर्व गोष्टी परदेशातून मागवाव्या लागत आहेत. पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या दरांनी उच्चांक गाठला असून सर्वसामान्य जनता भरडली जात आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, देशात सध्या कोणतीही शासकीय व्यवस्था उरलेली नाही. नीट परीक्षेचे पेपर आज हवेतून आणावे लागत आहेत, इतकी दुरवस्था झाली आहे. इंधन टंचाईच्या काळात केवळ खाजगी कंपन्या आणि ठराविक उद्योगपतींनीच अफाट पैसा कमावला असून, हे सरकार फक्त काही मोजक्या उद्योजकांसाठीच चालवले जात आहे. याशिवाय, समृद्धी महामार्गाच्या कामात तब्बल २० हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला असून, आता आगामी शक्तीपीठ महामार्गामध्येही मोठ्या प्रमाणात घोटाळा होणार असल्याचा दावा सपकाळ यांनी केला.

## ठाकरे गटातील अनेक जण आमच्या संपर्कात-संजय शिरसाट

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- ठाकरे गटाचे काही खासदार आणि आमदार राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याच्या वृत्ताने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा 'ऑ परेशन टायगर'च्या चर्चांना उधाण आले आहे. या संभाव्य राजकीय भूकंपावर शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मोठे सूचक विधान केले आहे. 'आमच्या संपर्कात सध्या अनेकजण आहेत. जेव्हा ऑ परेशन टायगर करायचे, तेव्हा ते एकनाथ शिंदे ठरवतील,' असे शिरसाट यांनी म्हटले आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

माध्यमांशी संवाद साधताना संजय शिरसाट पुढे म्हणाले, 'सध्या तरी आमची कोणतीही ऑपरेशन टायगर करण्याची मानसिकता नाही. आम्ही स्वतःहून तसे काही करत नाही आहोत. मात्र, ज्यांना आमच्यासोबत यायचे आहे, त्यांना आम्ही नाही म्हणणार नाही. अनेक जण आमच्या संपर्कात असून, आगामी काही महिन्यांत हे सर्व विरोधक एकत्र राहतील असे मला वाटत नाही.' त्यांच्या या विधानामुळे महाविकास आघाडीत (पान ४ वर)

# एआय आणि सायबर गुन्हेगारी

आजचे जग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. बँकिंग, शिक्षण, आरोग्य, व्यापार, शासन, संवाद, मनोरंजन, वाहतूक अशा प्रत्येक क्षेत्रात संगणक आणि इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला असून समाजमाध्यमे लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र शिक्षण, क्लाऊड संगणन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, मोठ्या प्रमाणातील माहिती विश्लेषण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवाचे जीवन अधिक वेगवान आणि सोयीस्कर झाले आहे. परंतु ज्या तंत्रज्ञानामुळे विकास साधला जात आहे, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर गुन्हेगार अत्यंत धोकादायक आणि चलाख पद्धतीने गुन्हे करत आहेत. पूर्वी चोर घर फोडत असत, पाकीटमार गर्दीत चोरी करत असत; परंतु आता गुन्हेगार संगणकाच्या पडद्यामागे बसून लाखो लोकांची माहिती चोरतात, बँक खाती रिकामी करतात, बनावट व्हिडीओ तयार करतात, प्रतिष्ठा नष्ट करतात आणि उद्योगांना कोट्यवधी रुपयांचे नुकसान पोहोचवतात. सायबर गुन्हेगारीचे स्वरूप आता केवळ तांत्रिक राहिलेले नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेचे मोठे आव्हान बनले आहे.

सायबर गुन्हेगारी म्हणजे संगणक, इंटरनेट, मोबाईल, डिजिटल नेटवर्क किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करून केलेले गैरकृत्य. यामध्ये माहिती चोरी, आर्थिक फसवणूक, हॅकिंग, बनावट संकेतस्थळे, फिशिंग, मालवेअर, रॅन्समवेअर, समाजमाध्यमांवरील छळ, ओळख चोरी, डीपफेक, अश्लील सामग्री प्रसारित करणे, डिजिटल ब्लॅकमेलिंग, सायबर स्टॉकिंग अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो. आज या सर्व प्रकारांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता एआय म्हणजे संगणकाला मानवी विचारसरणीप्रमाणे शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. हे तंत्रज्ञान उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, शेती, शिक्षण, संशोधन यासाठी अत्यंत उपयुक्त आहे; परंतु सायबर गुन्हेगारांनी त्याचा दुरुपयोग सुरू केला आहे. आज फिशिंग म्हणजेच सावज हेरण्यासाठी केले जाणारे हल्ले अधिक धोकादायक झाले आहेत. पूर्वी फसवणूक करणाऱ्या ईमेल व्याकरणदृष्ट्या चुकीच्या आणि सहज ओळखता येण्यासारख्या असत. आता कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केलेल्या ईमेल अत्यंत विश्वासार्ह वाटतात. या मेल संबंधित व्यक्तीच्या नावाने, कार्यालयाच्या शैलीत किंवा बँकेच्या अधिकृत भाषेत लिहिलेल्या असतात. गुन्हेगार समाजमाध्यमांवरील माहिती, नोकरीचे तपशील, मित्रपरिवार, आवडी-निवडी यांचा अभ्यास करून अत्यंत वैयक्तिक स्वरूपाचे संदेश पाठवतात. त्यामुळे सामान्य व्यक्ती सहज फसते.

भारतामध्ये अनेक नागरिकांना 'तुमचे बँक खाते बंद होणार आहे', 'केवायसी अपडेट करा', 'तुम्ही लॉटरी जिंकली आहे' किंवा 'तुमच्या खात्यातून पैसे कापले गेले' अशा संदेशांद्वारे फसवले जाते. काही प्रकरणांमध्ये बनावट ग्राहक सेवा क्रमांक तयार करून लोकांकडून दूरध्वनीद्वारे गुप्त माहिती मिळवली जाते. अलीकडील काळात भारतातील अनेक शहरांमध्ये 'डिजिटल अरेस्ट'चे प्रकार समोर आले. पोलीस, अंमलबजावणी अधिकारी किंवा न्यायालयीन अधिकारी असल्याचे भासवून गुन्हेगार नागरिकांना घाबरवतात आणि ऑनलाईन पैसे उकळतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार होणारे 'डीपफेक' हे आधुनिक काळातील सर्वात मोठे संकट मानले जात आहे. डीपफेक तंत्रज्ञानाद्वारे एखाद्या व्यक्तीचा चेहरा, आवाज किंवा हालचाली हुबेहूब नक्कल करून बनावट व्हिडीओ किंवा ध्वनिफीत तयार करता येते. काही महिन्यांपूर्वी भारतातील अनेक प्रसिद्ध कलाकार आणि उद्योजक यांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्हिडीओ प्रसारित झाले होते. काही गुन्हेगारांनी उद्योगपतींच्या आवाजाची नक्कल करून कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे आदेश दिले. परदेशात एका कंपनीच्या अधिकाऱ्याला त्याच्या वरिष्ठांचा बनावट आवाज ऐकवून लाखो डॉलर्सची फसवणूक करण्यात आली होती. अशा घटना भारतातही वाढू लागल्या आहेत. महिलांविरोधातील सायबर गुन्ह्यांमध्येही डीपफेक आणि मॉर्फिंगचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. समाजमाध्यमांवरील फोटो वापरून बनावट अश्लील चित्रफिती तयार केल्या जातात आणि त्याद्वारे ब्लॅकमेल केले जाते. विद्यार्थिनी, व्यावसायिक महिला, कलाकार आणि सार्वजनिक जीवनातील व्यक्ती या विशेषतः या प्रकाराला बळी पडतात. अशा प्रकारांमुळे मानसिक ताण, सामाजिक अपमान आणि आत्महत्येसारख्या घटना घडण्याचा धोका वाढतो. रॅन्समवेअर हा आणखी एक गंभीर सायबर हल्ला आहे. यामध्ये संगणकातील माहिती हडप केली जाते आणि ती पुन्हा मिळवण्यासाठी खंडणी मागितली जाते. रुग्णालये, बँका, उद्योग, सरकारी कार्यालये यांच्यावर अशा हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. भारतातील काही मोठ्या रुग्णालयांच्या संगणक प्रणालींवर हल्ले झाल्याने रुग्णसेवा विस्कळीत झाली होती. काही वर्षांपूर्वी देशातील एका प्रमुख वैद्यकीय संस्थेची माहिती प्रणाली ठप्प होऊन हजारो रुग्णांची माहिती धोक्यात आली होती. अशा घटनांमुळे राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे पासवर्ड फोडण्याची प्रक्रिया शक्य आणि वेगवान झाली आहे. अनेक लोक जन्मतारीख, मोबाईल क्रमांक किंवा साधे शब्द पासवर्ड म्हणून वापरतात. कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये लाखो संभाव्य संयोजनांचा अभ्यास करून योग्य पासवर्ड शोधू शकते. बॉट्सच्या मदतीने ताशी हजारो प्रयत्न केले जातात. त्यामुळे दुबळे पासवर्ड वापरणारे खाते सहज हॅक होते.

समाजमाध्यमे ही सायबर गुन्हेगारांसाठी मोठी शस्त्रे बनली आहेत. एखाद्या व्यक्तीची जीवनशैली, मित्रपरिवार, कार्यालय, प्रवास, आर्थिक स्थिती याबाबतची माहिती सहज उपलब्ध होते. गुन्हेगार या माहितीचा वापर करून भावनिक किंवा आर्थिक फसवणूक करतात. काहीजण खोट्या प्रोफाइलद्वारे मैत्री करतात, विश्वास संपादन करतात आणि नंतर पैशांची मागणी करतात. 'ऑनलाईन प्रेमसंबंध' आणि 'गुंतवणूक सल्ला' या नावाखाली मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. क्रिप्टोकरन्सी आणि ऑनलाईन गुंतवणूक योजनांमुळेही नवीन प्रकारची सायबर गुन्हेगारी वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने बनावट गुंतवणूक संकेतस्थळे, बनावट नफा दाखवणारे आकडे आणि खोटे ग्राहक अभिप्राय तयार केले जातात. लोकांना अल्पावधीत मोठा नफा मिळेल असे सांगून पैसे गुंतवायला भाग पाडले जाते. एकदा पैसे जमा झाले की संकेतस्थळ गायब होते. इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे घरातील अनेक उपकरणे इंटरनेटशी जोडली गेली आहेत. स्मार्ट दूरचित्रवाणी, सुरक्षा कॅमेरे, स्मार्ट कुलपे, रेफ्रिजरेटर, आवाजावर चालणारी उपकरणे यांमध्ये पुरेशी सुरक्षा नसल्यास गैरवापर होऊ शकतो. गुन्हेगार या उपकरणांमध्ये प्रवेश मिळवून घरातील हालचालींची माहिती मिळवून मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ले करण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून दिशाभूल करणारी माहितीही मोठ्या प्रमाणावर पसरवली जाते. निवडणुका, धार्मिक प्रश्न किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील मुद्द्यांवर बनावट संदेश आणि व्हिडीओ प्रसारित करुन समाजात भीती, द्वेष आणि अस्थिरता निर्माण केलीजाऊ शकते.

सायबर गुन्ह्यांविरोधात कायदे असले तरी तंत्रज्ञानाचा वेग खूप मोठा आहे. गुन्हेगार अनेकदा परदेशातून काम करतात. तेव्हा ओळख लपवण्यासाठी व्हर्च्युअल नेटवर्क, बनावट उपकरणे आणि गुप्त तंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे राहते. या परिस्थितीत केवळ सरकार किंवा पोलीस यंत्रणा पुरेशा नाहीत. प्रत्येक नागरिकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी दुव्यावर क्लिक करू नये, बँक माहिती किंवा संकेतशब्द कोणालाही सांगू नयेत, समाजमाध्यमांवर अतिवैयक्तिक माहिती शेअर करू नये, मजबूत संकेतशब्द वापरावेत. शैक्षणिक संस्था, उद्योग आणि शासन यांनीही आधुनिक सुरक्षाप्रणाली वापरणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुरक्षा साधने, माहिती सांकेतिकीकरण, नियमित बॅकअप, सुरक्षा तपासणी आणि कर्मचारी प्रशिक्षण यामुळे धोका कमी करता येतो. भारत सरकारने राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण, सायबर गुन्हे तक्रार पोर्टल आणि डिजिटल सुरक्षा मोहिमा सुरू केल्या आहेत. तरीही सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कायम सतर्कता ठेवावी लागणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवजातीसाठी अत्यंत शक्तिशाली आणि उपयुक्त निर्मिती आहे; परंतु या तंत्रज्ञानाचा विकास ज्या वेगाने होत आहे, त्याच वेगाने सायबर गुन्हेगारही चलाख आणि धोकादायक होत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, डिजिटल साक्षरता, मजबूत कायदे आणि जागतिक सहकार्य ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. सायबर सुरक्षितता ही आता केवळ तांत्रिक बाब राहिलेली नाही; तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी, प्रतिष्ठेशी आणि देशाच्या सुरक्षेशी जोडलेली आहे. म्हणूनच तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर करणे आवश्यक आहे.

# बालपणाला मुक्त श्वास देऊया

**दि. १२** जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायम स्वरूपी अपंगत्वही येते.


बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय



कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टीदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपर्कामुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते.

बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.

बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते.

शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते.

बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो. या दिवसानिमित्त आयोजित केले जाणारे जनजागृती कार्यक्रम, चर्चासत्रे, शालेय उपक्रम आणि मोहिमा समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यास मदत करतात. मुलांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी सामूहिक बांधिलकी निर्माण करणे हे या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल.

दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# मातीच्या फलकांपासून पुण्याच्या मंगळवार पेठेपर्यंत : जनगणनेचा इतिहास

आज आपण जनगणनेचा विचार करतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर घराघरांत जाऊन माहिती गोळा करणारे कर्मचारी, संगणक, टॅबलेट आणि लोकसंख्येचे प्रचंड आकडे उभे राहतात. परंतु जनगणनेचा इतिहास हा केवळ लोक मोजण्याचा इतिहास नाही; तो मानवी संस्कृती, राज्यकारभार, करव्यवस्था, युद्ध, व्यापार आणि नागरी विकासाचा इतिहास आहे. एखाद्या राजव्यवस्थेला आपल्या राज्यात किती लोक आहेत, किती जमीन लागवडीखाली आहे, किती कर मिळू शकतो आणि युद्धकाळात किती सैनिक उभे राहू शकतात हे जाणून घेण्याची गरज होती. या गरजेतूनच जनगणनेचा जन्म झाला.

इतिहासकारांच्या मते जगातील सर्वात जुन्या जनगणनांचे पुरावे सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीच्या बाबिलोनिया आणि इजिप्तमध्ये आढळतात. त्या काळात लोकसंख्या, जनावरे, शेती उत्पादन आणि मालमत्तेच्या नोंदी मातीच्या फलकांवर कोरल्या जात होत्या. प्राचीन इजिप्तमध्ये नाईल नदीच्या पुरानंतर जमिनीचे पुनर्वाटप आणि कर आकारणीसाठी या नोंदी वापरल्या जात असत. चीनमध्ये इ.स. २ मध्ये झालेल्या जनगणनेत तब्बल ५ कोटी ७६ लाख लोकांची नोंद झाली होती, जी त्या काळातील जगातील सर्वात मोठी लोकसंख्या नोंद मानली जाते. रोमन साम्राज्यात तर जनगणना ही शासनव्यवस्थेचा अविभाज्य भाग होती. दर पाच वर्षांनी नागरिक, त्यांची मालमत्ता आणि सैनिकी क्षमता यांची नोंद घेतली जात असे. आज वापरला जाणारा 'सेन्सस' हा शब्दही रोमन भाषेतील 'सेन्सेरे' या शब्दापासूनच आला आहे.

भारतामध्येही जनगणनेची परंपरा फार जुनी आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नागरिकांची, त्यांच्या व्यवसायांची आणि मालमत्तेची नोंद ठेवण्याचे निर्देश आढळतात. मौर्यकालात प्रशासनाकडे अशा प्रकारच्या नोंदी उपलब्ध असत. मोगल काळात अबुल फजलने लिहिलेल्या आइन-ए-अकबरीमध्ये राज्याची लोकसंख्या, शेती, महसूल, उद्योग आणि सामाजिक जीवनाची विस्तृत माहिती दिली आहे. जरी ती आधुनिक अर्थाने जनगणना नसली तरी लोकसंख्याविषयक माहितीचा तो एक महत्त्वाचा स्रोत मानला जातो.

महाराष्ट्रात जनगणनेसाठी 'खानेसुमारी' हा शब्द प्रचलित होता. पेशवाईच्या काळात महसूल, कर आकारणी आणि प्रशासनासाठी शहरातील घरे, वाडे, दुकाने, देवळे, मठ आणि रहिवाशांची नोंद ठेवली जात असे. या नोंदी आज इतिहास संशोधकांसाठी अमूल्य ठेवा ठरल्या आहेत. पुण्यातील विविध पेठांची खानेसुमारी त्यापैकीच एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

याचे सर्वात रोचक उदाहरण म्हणजे मंगळवार पेठेची इ.स. १८१८ नंतरची खानेसुमारी. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने पुण्याचा ताबा घेतल्यानंतर अवघ्या काही महिन्यांत ही नोंद तयार करण्यात आली. आज ही कागदपत्रे आपल्याला दोनशे वर्षांपूर्वीच्या पुण्यात प्रत्यक्ष फिरून आल्याचा अनुभव देतात.

या खानेसुमारीनुसार मंगळवार पेठेत एकूण २६१ घरे आणि ७०५ खण होते. आज एखाद्या मध्यम आकाराच्या गृहनिर्माण सोसायटीत जितकी घरे असतात, तितकी संपूर्ण पेठेत नव्हती. त्या घरांपैकी ७४ माडीची, ८३ एकमजली आणि ८५ छपरी घरे होती. म्हणजेच त्या काळातही घरांच्या प्रकारांवरून आर्थिक स्थितीचा अंदाज घेतला जात होता. विशेष म्हणजे १७ खुल्या जागांची आणि दोन देवळांची स्वतंत्र नोंद करण्यात आली होती. यावरून प्रशासनाची माहिती संकलित करण्याची पद्धत किती तपशीलवार होती याची कल्पना येते. या पेठेतील सामाजिक रचनाही तितकीच मनोरंजक होती. ४२ ब्राह्मण, ४६ कुणबी-मराठे, २७ वाणी, १२ तेली, ६ मुसलमान, ४ जैन, ३ कुंभार, ३ गोसावी आणि १ सोनार यांची घरे येथे होती. आज ज्या विविधतेचा अभिमान पुणे बाळगते, तिची मुळे दोनशे वर्षांपूर्वीच्या या नोंदीत स्पष्ट दिसतात. मंगळवार पेठेतील जीवन केवळ निवासी नव्हते; ते आर्थिक आणि प्रशासकीय दृष्ट्याही महत्त्वाचे होते. येथे चार सरकारी चौक्या कार्यरत होत्या. म्हणजेच त्या काळातही कायदा आणि सुव्यवस्थेसाठी संघटित यंत्रणा अस्तित्वात होती. दोन प्रमुख देवळे होती आणि त्यांना करमाफी देण्यात आली होती. गोसाव्यांचे मठ आणि काही इतर संस्थांनाही करसवलती मिळत होत्या. आजच्या करसवलतींच्या संकल्पनेची ही ऐतिहासिक झलक म्हणता येईल.

या नोंदीत त्या काळातील प्रतिष्ठित व्यक्तींचाही उल्लेख आहे. महादेव मायेनकर, सिताराम नाईक चिकटे, बालाजीपंत दामले, भिकाजीपंत सुभेदार, हाणवतराव सितोले यांसारखे सावकार, सरदार आणि मुत्सद्दी या पेठेत राहत होते. त्यामुळे ही खानेसुमारी केवळ लोकसंख्येची नोंद नसून त्या काळच्या पुण्याच्या सामाजिक आणि आर्थिक अभिजनांचा आराखडाच ठरते. ब्रिटिशांनी १८७२ मध्ये भारतात पहिली व्यापक जनगणना करण्याचा प्रयत्न केला आणि १८८१ मध्ये पहिली अधिकृत, देशव्यापी आणि एकाच वेळी होणारी जनगणना पार पडली. तेव्हा भारताची लोकसंख्या सुमारे २५ कोटी होती. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींहून अधिक आहे. परंतु जनगणनेचे महत्त्व मात्र बदललेले नाही. पूर्वी ती कर आणि सैन्यासाठी वापरली जात होती; आज ती विकास, नियोजन, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्यायासाठी वापरली जाते. म्हणूनच जनगणना ही केवळ आकडेवारी नसते. ती इतिहासाची टाइम मशीन असते. जशी मंगळवार पेठेची १८१८ मधील खानेसुमारी आपल्याला पेशवाईनंतरच्या पुण्याचे जिवंत चित्र दाखवते, तशीच आजची जनगणना भविष्यातील इतिहासकारांना आपल्या काळातील भारताचे दर्शन घडविणार आहे. दोनशे वर्षांनंतर कदाचित एखादा संशोधक आजच्या नोंदी वाचत असेल आणि आपल्या समाजाची कथा उलगडत असेल. म्हणूनच जनगणना म्हणजे केवळ लोकांची मोजणी नव्हे, तर काळाची नोंद होय. त्यामुळे सर्व जनतेनी यात सहभाग नोंदवावा. आलेल्या प्रगणकाला आपल्या देशाच्या विकासाच्या पायाभरणीचा दूत समजून त्याला सौजन्यपूर्ण वागणूक द्यावी. याबाबतीत प्रशासनानेही वेळोवेळी सहकार्याचे आवाहन केले आहे. चला आपण या शतकातल्या सर्वात मोठ्या जनगणनेत सहभाग नोंदवून साक्षीदार होऊ या...!!

**- युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.

# नियत वाईट असलेल्यांना तुमच्या सावलीतही उभे करू नका

समाज हा सामाजिक संबंध व सामाजिक नात्यांचा समुदाय आहे.समाजातील प्रत्येक व्यक्ती एक दुसऱ्याच्या सहकार्य,मदत,सामाजिक संबंध व सदभाव, याच्यावर जगत असते.या समाजात विभिन्न मत व विचारांच्या व्यक्ती असतात. काही नकारात्मक तर काही सकारात्मक विचार उराशी बाळगून समाजात वास्तव्य करीत असतात.समाजात जगत असताना बऱ्याच व्यक्तींवर वाईट प्रसंग व घटना येत असतात, अशा समयी समाजातील प्रत्येकाने वाईट प्रसंग आलेल्या व्यक्तीला सहकार्य करणे,त्याच्या मदतीला धावून जाणे त्यांचे सुख, दुःख वाटून घेणे, हा सामाजिक धर्म आहे, समाज धर्म प्रत्येकाने पाळायला हवा.समाज धर्म पाळणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य असायला हवे.पण नकारात्मक विचारांच्या किंवा अहित उराशी बाळगून जगणाऱ्या व्यक्ती या नेहमी समाज प्रवाहाच्या विरुद्ध वागत असतात,त्या सदैव अहिताच्या बाजूनेच असतात.समाजाशी किंवा समाजातील लोकांशी त्यांना काही घेणे-,देणे नसते.समाजातील ज्या व्यक्ती किंवा कुटुंबावर वाईट प्रसंग किंवा वाईट वेळ आलेली आहे अशा समयी समाजातील सर्वांनी त्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहणे, हा समाज धर्म आहे.परंतु समाजातील ज्यांची नियत वाईट असते,ज्याची सदैव नकारात्मक भूमिका असते,अशांना तुमच्या सावलीत सुद्धा उभे करू नका.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# श्री स्वामी समर्थ मंदिरात २५१ आंब्यांची आरास



वैजापूर, दि. ११ (प्रतिनिधी) - अधिक मास (पुरुषोत्तम महिना) व कमला एकादशीचे महात्म्य साधत सेवेकरी धनंजय उचित यांनी गुरुवार (ता.११)रोजी सकाळी स्वामींच्या आरती आधी येथील श्री. स्वामी समर्थ केंद्रात, श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेसमोर२५१ आंब्यांची आरास लावून श्री स्वामी समर्थांची सेवा केली.

अत्यंत व्यवस्थित ही आरास असल्याने आरती समयी जमलेल्या सेवेकरीचे लक्ष वेधून घेत होती. सेवेकरी सुमनबाई आलूले, सी.के. पवार, सचिन राजपूत, श्रीमती अनर्थे, धोंडीरामसिंह राजपूत व भाविक यांची या समयी उपस्थिती होती.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी नामांकनांना सुरुवात

नवी दिल्ली, दि. ११ (वृत्तसंस्था) - प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी ऑनलाइन नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज httPs://awards.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने सादर करावेत असे आवाहन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने केले आहे.

भारतात वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक आणि ३१ जुलै २०२६ रोजी ५ ते १८ वर्षे वयोगटातील बालके या पुरस्कारासाठी पात्र आहेत. या पुरस्कारासाठी स्व-नामांकन तसेच तृतीय पक्षाकडून शिफारस अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांना मान्यता दिली जाणार आहे.

**अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै**

अर्ज करताना उमेदवारांनी वैयक्तिक माहिती, पुरस्काराचा प्रवर्ग, अलीकडील छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

तसेच आपल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि तिच्या समाजावरील प्रभावाची माहिती १,००० शब्दांपर्यंत सादर करावी लागणार आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांतर्गत शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण तसेच कला व संस्कृती या सहा क्षेत्रांमध्ये असाधारण कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्यात येतो.

शौर्य प्रवर्गात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचविण्यासाठी धैर्य दाखवणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. क्रीडा प्रवर्गात राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या मुलांना गौरविण्यात येते. समाजसेवा प्रवर्गात समाजकल्याण, पर्यावरण संवर्धन, गरजूंना मदत आणि राष्ट्रीय कार्यांमध्ये सक्रिय योगदान देणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो.

विज्ञान व तंत्रज्ञान प्रवर्गात संशोधन, नवोपक्रम किंवा वैज्ञानिक नमुने विकसित करणाऱ्या मुलांना पुरस्कार दिला जातो. पर्यावरण प्रवर्गात शाश्वत विकास, जनजागृती मोहीम किंवा पर्यावरणपूरक नवकल्पनांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या मुलांची निवड केली जाते. तर कला व संस्कृती प्रवर्गात संगीत, नृत्य, लेखन, चित्रकला, अभिनय किंवा इतर कलाक्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रावीण्य मिळवलेल्या मुलांचा गौरव केला जातो.

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने शाळा, शैक्षणिक संस्था, पालक, मार्गदर्शक आणि सर्वसामान्य नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी देशातील प्रतिभावान आणि प्रेरणादायी बालकांचा शोध घेऊन त्यांच्या नावांची शिफारस करावी. देशातील प्रत्येक गुणी आणि कर्तृत्ववान बालकाला राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळावी, यासाठी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

# शहरातील हॉटेल मालक महापालिकेला जुमानेनात; फायर एनओसी नोटिशींना प्रतिसादच नाही

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - दिल्लीतील एका हॉटेलमध्ये लागलेल्या भीषण आगीत २१ जणांचा होरपळून मृत्यू झाल्यानंतर देशभरातील प्रशासन सतर्क झाले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि दवाखान्यांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. मात्र, या मोहिमेत धक्कादायक बाब समोर आली असून महापालिकेने बजावलेल्या नोटिशींना एकाही आस्थापनेकडून अद्याप उत्तर मिळालेले नाही.

महापालिका आयुक्त अमोल येडगे आणि स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांनी नुकतीच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शहरातील व्यावसायिक इमारतींचे फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने तपासणी मोहीम सुरू केली.




## कारवाई सुरूच राहणार

तपासणी करून नोटिसा देण्यात आल्या आहेत. अद्याप कोणत्याही आस्थापनेकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. संबंधित विभागाकडून हॉटेल्सची यादी मिळणे बाकी असले तरी नोटीस बजावण्याची आणि तपासणीची कारवाई सातत्याने सुरू राहणार आहे.

**- अशोक खांडेकर**
मुख्य अग्निशमन अधिकारी

गेल्या पाच दिवसांत शहरातील ७८ हॉटेल, रेस्टॉरंट आणि दवाखान्यांना फायर एनओसी (अग्निशमन दाखला) संदर्भात नोटिसा बजावण्यात आल्या. या नोटिशींमध्ये अग्निसुरक्षा नियमांचे पालन, आवश्यक परवानग्या आणि सुरक्षा उपाययोजनांची माहिती सादर करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, पाच दिवस उलटूनही एकाही आस्थापनेने महापालिकेकडे खुलासा सादर केलेला नाही.

**महापालिकेतील अंतर्गत गोंधळही अडथळा** - अग्निशमन विभागाच्या कारवाईत आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. शहरात नेमकी किती हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स कार्यरत आहेत, याची अधिकृत माहितीच महापालिकेच्या संबंधित विभागांकडे उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अग्निशमन विभागाने कर आकारणी विभागाकडे वारंवार हॉटेल्स व व्यावसायिक आस्थापनांची संपूर्ण यादी मागविली. मात्र, अद्याप ही माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे शहरात किती आस्थापने फायर एनओसीशिवाय सुरू आहेत, याचा अचूक अंदाज घेणे विभागासाठी कठीण बनले आहे.

**नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर** - दिल्लीतील दुर्घटनेनंतर अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अशा परिस्थितीत शहरातील हॉटेल आणि व्यावसायिक आस्थापनांकडून महापालिकेच्या नोटिशींना प्रतिसाद न मिळणे चिंताजनक मानले जात आहे. तसेच महापालिकेच्या विभागांमधील समन्वयाचा अभावही या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळा ठरत असल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात महापालिका कठोर भूमिका घेत संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करते की नाही, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत परभणी रेल्वे स्थानकावर आरपीएफ नांदेडकडून तीन संशयित चोरट्यांना अटक

नांदेड, दि. ११ (प्रतिनिधी) - प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रती असलेली आपली बांधिलकी अधिक दृढ करत, रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभागाने ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत परभणी रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सामानाची चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन संशयितांना अटक केली. रेल्वे प्रवाशांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या विशेष देखरेखी दरम्यान श्री अमोल वावळे, एएसआय/आरपीएफ, यांनी ९ व १० जून २०२६ रोजी परभणी रेल्वे स्थानकावर तीन संशयित 'थीफ्ट ऑफ पॅसेंजर बिलॉंगिंग्स' गुन्हेगारांना ताब्यात घेतले.

पहिली कारवाई ९ जून २०२६ रोजी दुपारी १३:५५ वाजता प्लॅटफफॉर्म क्रमांक १ वर ट्रेन क्रमांक ५७६५२ मनमाड - हजूर साहिब नांदेड एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान करण्यात आली. किरण (वय २५ वर्षे), रा. बीड, हा संशयित मागील जनरल डब्यात चढणाऱ्या प्रवाशांच्या सामानावर डल्ला मारण्याच्या प्रयत्नात असल्याचे आढळून आले. त्यास पुढील कारवाईसाठी जीआरपी परभणीकडे सुपूर्द करण्यात आले.

जीआरपीने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अंतर्गत गुन्हा क्रमांक १२२/२०२६ नोंदवून पुढील कारवाई सुरू केली.

यानंतर १० जून २०२६ रोजी प्लॅटफफॉर्म क्रमांक ३ वर ट्रेन क्रमांक १७६६१ नागरसोल - काचीगुडा एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान विशेष देखरेख सुरू असताना, सुमारे १४:२५ वाजता अनिस (वय ४२ वर्षे), रा. परभणी, यास प्रवाशांच्या सामानाची चोरी करण्याच्या प्रयत्नात पकडण्यात आले. त्यास जीआरपी परभणीकडे सुपूर्द करण्यात आले असून त्याच्याविरुद्ध बीएनएसएस-२०२३ च्या कलम १२८ अंतर्गत गुन्हा क्रमांक २५/२०२६ नोंदवून तपास सुरु करण्यात आला आहे.

त्यानंतर सुमारे १४:३० वाजता, चंद्रकांत (वय ४० वर्षे), रा. नांदेड, यासही त्याच रेल्वेत चढणाऱ्या प्रवाशांना लक्ष्य करण्याच्या प्रयत्नात ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध जीआरपी परभणी येथे महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अंतर्गत गुन्हा क्रमांक १२५/२०२६ नोंदविण्यात आला आहे.

रेल्वे पोलीस बल, नांदेड (आरपीएफ) यांच्या सतर्कता, दक्षता आणि तात्काळ कारवाईमुळे संभाव्य चोरीच्या घटना रोखण्यात यश आले असून गर्दीच्या वेळी प्रवाशांच्या सुरक्षिततेची प्रभावीपणे खात्री करण्यात आली.

या यशस्वी कारवाया ऑपरेशन यात्री सुरक्षाच्या प्रभावी अंमलबजावणीचे तसेच आरपीएफ नांदेडच्या सुरक्षित रेल्वे प्रवासासाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे द्योतक आहेत. आरपीएफ नांदेडतर्फे प्रवाशांना आपल्या सामानाची काळजी घेण्याचे, सतर्क राहण्याचे तसेच कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित रेल्वे सुरक्षा कर्मचाऱ्यांना किंवा रेल्वे हेल्पलाईन १३९ वर माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# एकलव्य संघटना महाराष्ट्र राज्य यांच्याकडून आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करावी, या मागणीसाठी एकलव्य संघटना महाराष्ट्र राज्याच्या वतीने १० जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. शिवाजीराव ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला असून, कार्यक्रमाचे आयोजन शहराध्यक्ष मंजीत नामदेव गायकवाड यांनी केले.

यावेळी बोलताना मंजीत गायकवाड यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत आदिवासी समाजाला अनेकदा अन्यायकारक व अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचा आरोप केला. समाजाच्या न्याय्य मागण्या मांडणे आणि लोकशाही मार्गाने न्याय मागणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार असून, तो अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्याचे त्यांनी नमूद केले.

गायकवाड म्हणाले की, शासनाच्या विविध योजना आणि महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी सर्वसामान्य नागरिकांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. अनेक प्रकरणांमध्ये अधिकारी आणि कर्मचारी नागरिकांना वेळेवर न्याय देत नाहीत. त्यामुळे आदिवासी समाजातील नागरिकांना मानसिक, आर्थिक आणि सामाजिक त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदनामध्ये आदिवासी समाजाशी संबंधित विविध महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये आदिवासी जमीन पुनर्स्थापना विशेष मोहीम प्रभावीपणे राबविणे, तालुकानिहाय जमीन हस्तांतरण प्रकरणांची सखोल चौकशी करणे, आदिवासी नागरिकांसाठी विशेष मदत केंद्र सुरू करणे, नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे तसेच शासनाच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा समावेश आहे.

तसेच सावंगी, तुळजापूर, आश्रफपूर आणि केसापुरी येथील अनेक जमीन प्रकरणे दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याचे सांगत त्या प्रकरणांवर त्वरित निर्णय घेण्याची मागणीही करण्यात आली. आदिवासी समाजातील अनेक कुटुंबे ग्रामपंचायत गावठाण तसेच शासकीय जमिनींवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असूनही त्यांच्या नावांची शासकीय नोंद झालेली नाही. विशेषतः भिल समाजातील कुटुंबांचे अतिक्रमण शासनाच्या नियमांनुसार नियमित करून त्यांना कायदेशीर हक्क प्रदान करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पत्रकारांशी संवाद साधताना मंजीत गायकवाड यांनी प्रशासनाने आदिवासी समाजाच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करू नये, असे स्पष्ट केले. शासनाच्या विविध आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करून आदिवासी बांधवांना न्याय मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सादर करण्यात आलेल्या निवेदनातील मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न झाल्यास एकलव्य संघटनेच्या वतीने जिल्हास्तरावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही मंजीत गायकवाड यांनी दिला. त्यामुळे प्रशासन या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे आदिवासी समाजाचे लक्ष लागले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त 'एक लाख वृक्ष लागवड' अभियानास उत्साहात प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन म्हणून धर्मन ग्रुप, जीआर फाउंडेशन आणि जे. जे. प्लस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गएक लाख वृक्ष लागवड अभियानङ्ख सुरू करण्यात आले आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची शुभ सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशभरातील ज्योतिर्लिंगांचे जतन, पुनर्बांधणी तसेच हिंदू संस्कृतीच्या संरक्षणासाठी दिलेले योगदान आजही समाजासाठी प्रेरणादायी मानले जाते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि वाढते तापमान, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास तसेच हरित पर्यावरणाची वाढती गरज लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर येथील 'हरे का सहारा, खाटूश्याम जी हमारा' या नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिर परिसरात तब्बल २०० वृक्षांची लागवड करण्यात आली. विविध प्रकारची पर्यावरणपूरक व स्थानिक हवामानास अनुकूल झाडे लावून हरित परिसर निर्माण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.





या कार्यक्रमाला आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच डॉ. जीवन राजपूत, धर्मन ग्रुपचे पदाधिकारी, जीआर फाउंडेशन व जे. जे. प्लस हॉस्पिटलचे प्रतिनिधी यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदविला.

यावेळी खाटूश्यामजी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष किरण दौड, डॉ. रोहन जाधव, डॉ. मोहिनी पाथ्रीकर, मोहन गिरी, मयुरी खोडपे, प्रशिक कोलते, साहिल काळे, यश पाटील, राजू महेर यांच्यासह सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करताना वाढत्या तापमानवाढीमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटांचा उल्लेख केला. भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ व निरोगी पर्यावरण मिळावे यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

आयोजकांच्या माहितीनुसार, हे अभियान केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित न राहता वृक्षसंवर्धनावरही विशेष भर देणार आहे. पुढील काही दिवसांत शाळा, महाविद्यालये, गावे, सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. एक लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करून छत्रपती संभाजीनगर आणि परिसर अधिक हरित करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी खाटूश्यामजी मंदिर ट्रस्टचे विश्वस्त, सर्व सहकारी, स्वयंसेवक आणि उपस्थित नागरिकांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले. पर्यावरण संरक्षणासाठी समाजाच्या सर्व स्तरातून मिळणारा प्रतिसाद पाहता हे अभियान व्यापक लोकचळवळ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# १७ वर्षीय मुलाला रबरी पाईप, बेल्ट, काठीने अमानुष मारहाण

## पडेगावच्या पोलीस भरती अकॅडमीतील धक्कादायक प्रकार

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- पडेगाव येथील भारत करिअर अकॅडमीतील एका शिक्षकाने १७ वर्षीय मुलाला रबरी पाईप, बेल्ट, काठीने अमानुष मारहाण करत डोक्यावर उभे करत शिक्षा केली. मेसमध्ये जेवण जास्त घेतले म्हणून पुन्हा बदडले. हा संतापजनक प्रकार मंगळवारी (९ जून) रात्री समोर आल्यानंतर त्याच्या आईने बुधवारी (१० जून) छावणी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अकॅडमीचा शिक्षक विवेक ढाकणे (मॅनेजर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

बुलडाण्याच्या ३६ वर्षीय महिलेने याप्रकरणात तक्रार दिली आहे. तक्रारीत म्हटले आहे, की त्यांचा १७ वर्षीय मुलगा ओंकार (नाव बदलले आहे) १७ जून २०२५ पासून पडेगावच्या भारत करिअर अकॅडमीत पोलीस भरतीची तयारी करीत आहे. त्यासाठी वर्षाकाठी ३० हजार रुपये शुल्क भरलेले आहेत. महिन्याकाठी ४ हजार रुपये होस्टेल आणि मेसकरिता अकॅडमीत भरतात. मंगळवारी (९ जून) ओंकारने आईला फोन करून सांगितले, की अकॅडमीत मेसमध्ये जेवण जास्त का घेतले म्हणून तेथील विवेक ढाकणे यांनी खूप मारहाण केली आहे.

त्यामुळे महिलेने आधी अकॅडमीत फोनवर विचारणा केली. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी बुधवारी (१० जून) सकाळी १० च्या सुमारास छत्रपती संभाजीनगरला येऊन अकॅडमीत ओंकारची भेट घेतली. त्याने आईला सांगितले, की रविवारी (७ जून) सुद्धा पी. टी. मास्तर विवेक ढाकणे (मॅनेजर) यांनी पहाटे दोन ते ४ च्या दरम्यान टेरेसवर बोलावून रबरी पाईप, बेल्ट व काठीने पाठीवर मारहाण केली आहे. त्यावरून महिलेने सीसीटीव्ही फूटेज तपासले असता त्यात विवेक ढाकणे हा ओंकारला कशाने तरी पाठीवर जोरदार मारहाण करताना दिसत आहे.

ओंकारला भिंतीला पाय लावून डोक्यावर उभे करून शिक्षा करताना दिसत आहे. ढाकणे याने ओंकार हा १७ वर्षांचा आहे, हे माहीत असतानाही त्याला आधी टेरेलसवर नंतर मंगळवारी रात्री ८ ला मेसमध्ये जेवण जास्त का घेतले म्हणून मारहाण केली.

तक्रार देताना महिलेने मारहाणीचे सीसीटीव्ही फूटेजही भारत करीअर अकॅडमीतून मिळवून पोलिसांना दिले. अधिक तपास पोलीस अंमलदार रवींद्र देशमुख करत आहेत.

# मंत्री अतुल सावे छत्रपती संभाजीनगर क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी 'बिनविरोध'



छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात राजकारण आणि क्रिकेट याचा फार जवळचा संबंध आहे. केवळ क्रिकेटच नाही तर कबड्डी व इतर खेळांच्या मैदानातही राज्यातील अनेक दिग्गज नेते आपले कर्तृत्व गाजवताना दिसत आहेत. क्रिकेटच्या मैदानात राजकारण्यांची फटकेबाजी नवीन आहे. क्रिकेटमधील दिग्गज खेळाडूंनाही राजकारणाचे मैदान अनेकदा खुणावते. आज अनेक माजी क्रिकेटपटू दिल्लीच्या संसदेत दिसतात.

भाजपचे आशिष शेलार यांच्यासह शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, काँग्रेस अशा सगळ्याच राजकीय पक्षांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनमध्ये पदे भूषवली आहेत. मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांची बिनविरोध निवड झाल्याने आणखी एका राजकीय नेत्याचे नाव क्रिकेट क्षेत्राशी जोडले गेले आहे. यापूर्वी भाजपचेच माजी शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर यांनीही संभाजीनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षपद भूषवलेले आहे. त्यामुळे राजकारणाचे मैदान गाजवणाऱ्या भाजपच्या स्थानिक नेत्यांनी क्रिकेटचे मैदानही गाजवल्याचे हे पहिले उदाहरण नाही. छत्रपती संभाजीनगरच्या पूर्व विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या अतुल सावे यांच्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष मर्जी राहिली आहे.

# 'स्वाधार' योजनेच्या लाभासाठी शासकीय वसतिगृहासाठी अर्ज बंधनकारक

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना आता प्रक्रियेचे पालन करावे लागणार आहे.

शासनाच्या नवीन निर्देशानुसार, थेट स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल. ज्या विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेनुसार वसतिगृहात होईल, त्यांना तिथे प्रवेश दिला जाईल. मात्र, केवळ ज्या विद्यार्थ्यांना जागेअभावी किंवा गुणवत्तेमुळे शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणे शक्य होणार नाही, अशाच विद्यार्थ्यांना 'स्वाधार' योजनेचा लाभ दिला जाईल.

जे विद्यार्थी वसतिगृहासाठी अर्जच करणार नाहीत, त्यांना दोन्ही योजनांपासून वंचित राहावे लागेल. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे उपलब्ध नाहीत, तिथे हा नियम शिथिल ठेवण्यात आला असला तरी, भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी मागील परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत, ते विद्यार्थी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करू शकतात. शालेय अभ्यासक्रम ३० जून २०२६ आणि ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम यासाठी १५ जुलै २०२६ पर्यंत संबंधित विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपले प्रस्ताव ऑनलईन सादर करावेत, मुदतीनंतर सादर होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याने विद्यार्थ्यांनी वेळेत तातडीने अर्ज करावेत.

# महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांना समारंभपूर्वक निरोप

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आदित्य जीवने यांची महावितरणाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदावरून नुकतीच जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तपदी बदली झाली. यानिमित्त जीवने यांना महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयातर्फे गुरुवारी (११ जून) समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.

कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर, नाशिक येथील नेटवर्क प्लॅनिंग सेलचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रादेशिक कार्यालयासह परिमंडल, मंडल, विभाग, उपविभाग कार्यालये तसेच कर्मचारी-कामगार संघटनांच्या वतीने जीवने यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. मुख्य अभियंता कुमठेकर, कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, विजय मोरे, शुभांगी कटकधोंड, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, सहायक अभियंता अविनाश चव्हाण यांनी जीवने यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकून त्यांच्या कारकिर्दीबाबत गौरवोद्गार काढले. छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून वर्षभराच्या कारकिर्दीत सर्व अभियंते,



अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या साथीने मराठवाड्यातील ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देता आल्याचे समाधान आहे, अशी भावना जीवने यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास अधीक्षक अभियंता गोरक्षनाथ सपकाळे, महेश पवार, बीना सावंत, प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, शंकर कुलकर्णी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, प्रणाली विश्लेषक मनीषा निफाडकर, राजाराम पाटील, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, विलास खंडाळे, महेंद्र देशमुख, गिरीश गायकवाड, व्यवस्थापक संजय खाडे, विधी अधिकारी सुनील पावडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले.

### रेल्वे स्टेशन परिसरात अनोळखी इसमाचा मृत्यू; ओळख पटविण्याचे पोलिस प्रशासनाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथील बुकिंग ऑफिससमोरील एस.बी.आय. एटीएम लगत एक अनोळखी इसम आज बेशुद्धावस्थेत आढळून आला होता. प्रकृती गंभीर असल्याने त्याला तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्या व्यक्तीला मृत घोषित केले.

या प्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, पोलिसांनी नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे.

वय अंदाजे ५०वर्षे रंग, सावळा,नाक बसके केस काळे,पोशाख, काळसर रंगाची पँट घातलेली असून या वर्णनाच्या व्यक्तीबाबत कोणाकडे काहीही माहिती असल्यास, त्यांनी तत्काळ वेदांत नगर पोलीस ठाण्याशी किंवा सहायक फौजदार व्हि. के. चव्हाण यांच्याशी ९७६७१७०११० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## बनेवाडीत महानगरपालिकेचा धडक ॲक्शन प्लॅन; अनधिकृत नळ कनेक्शनधारकांना आठ दिवसांची अंतिम मुदत

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- शहरातील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, यात शिस्त आणण्यासाठी आणि अनधिकृत नळ जोडण्यांना आळा घालण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने बनेवाडी परिसरात आज धडक कारवाई मोहीम राबविली. या मोहिमेमुळे अनधिकृत नळ कनेक्शनधारकांमध्ये एकच खळबळ उडाली असून, प्रशासनाने संबंधितांना आठ दिवसांची अंतिम मुदत देत कडक इशारा दिला आहे.

महानगरपालिकेने या कारवाईसाठी यापूर्वीच पोलीस बंदोबस्ताची मागणी केली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक प्रविणा यादव, उपनिरीक्षक नामदेव सुपे आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या कडक बंदोबस्तात महानगरपालिकेचे अधिकारी व विशेष पथक




घटनास्थळी दाखल झाले. अनधिकृत नळ कनेक्शन शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

या मोहिमेत सहाय्यक अभियंता मिलिंद भामरे, पथक प्रमुख रोहित इंगळे, कनिष्ठ अभियंता अमित पंडागळे, विक्रांत सावंत, सुमित बोराडे तसेच महानगरपालिकेच्या अनधिकृत नळ कनेक्शन शोध व निर्मूलन पथकाने सक्रिय सहभाग घेतला.

कारवाई सुरू असतानाच मा. अतिरिक्त आयुक्त-२ कल्पिता पिंपळे यांच्या आदेशानुसार आणि मां. नगरसेवक अब्दुल मतीन खान यांच्या विनंतीनंतर नागरिकांच्या अडचणींचा विचार करून प्रशासनाने तात्पुरती कारवाई स्थगित केली. मात्र, यावेळी नागरिकांना स्पष्टपणे सांगण्यात आले की, ही केवळ अंतिम संधी असून पुढील आठ दिवसांत सर्व संबंधितांनी आपल्या अनधिकृत नळ कनेक्शनच्या संचिका तयार करून नियमानुसार ते अधिकृत करून घ्यावेत. महानगरपालिका प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेतली असून, दिलेल्या मुदतीत कनेक्शन नियमित न करणाऱ्या नागरिकांवर कोणतीही पूर्वसूचना न देता थेट कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तरी शहरातील सर्व नागरिकांनी नियमांचे पालन करून पाणीपुरवठा यंत्रणेला सहकार्य करावे. अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करण्यासाठी ही शेवटची संधी असून, भविष्यात होणाऱ्या कारवाईची संपूर्ण जबाबदारी संबंधित नागरिकांची राहील असे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात येत आहे.

### नांदेड विभागात विशेष तिकीट तपासणी मोहीम; अनधिकृत प्रवासाची १,१५५ प्रकरणे आढळली, ५.८६ लाख महसूल वसूल

नांदेड दि.११ (प्रतिनिधी)- प्रवाशांना सुरक्षित, सुलभ व नियमबद्ध प्रवासाचा अनुभव देण्याच्या तसेच विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्याच्या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दिनांक ०९ जून २०२६ रोजी विभागातील विविध रेल्वे स्थानके व गाड्यांमध्ये व्यापक विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा मुख्य उद्देश महसूल गळती रोखणे, प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि वैध तिकीटधारक प्रवाशांना अधिक सुरक्षित व आरामदायी प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे हा होता.

या विशेष मोहिमेदरम्यान तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी गाड्या, रेल्वे स्थानके तसेच महत्त्वाच्या प्रवासी क्षेत्रांमध्ये व्यापक तपासणी केली. या संयुक्त प्रयत्नांतून विनातिकीट प्रवास करणाऱ्या ८०४ प्रवाशांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्यातून ४,४७,०१० इतका महसूल प्राप्त झाला. याशिवाय अनियमित प्रवास करणाऱ्या २४५ प्रवाशांची प्रकरणे नोंदविण्यात आली असून त्यातून १,२२,५५० महसूल वसूल करण्यात आला. तसेच बुक न केलेल्या सामानाच्या १०६ प्रकरणांमधून १६,८९५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

अशाप्रकारे या विशेष मोहिमेत एकूण १,१५५ प्रकरणे आढळून आली असून रेल्वेला ५,८६,४५५ इतका महसूल प्राप्त झाला.

## (पान १ वरुन)

### पश्चिम आशियातील तणाव..

या युद्धाचा सर्वात मोठा फटका जागतिक तेल व्यापाराला बसण्याची शक्यता आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या ऑईल टँकर्स आणि व्यापारी जहाजांसाठी पूर्णपणे बंद केली आहे. इराणच्या लष्कराने इशारा दिला आहे की, ''या भागात आलेले कोणतेही जहाज उडवले जाईल, त्यामुळे आंतरराष्ट्रीय जहाजांनी ती आता स्वतःच्या जबाबदारीवर उतरवावीत.'' इराणच्या या घोषणेनंतरही अमेरिकी सेंट्रल कमांडने व्यापारी जहाजांची वाहतूक अजूनही सुरू असल्याचा दावा केला आहे. दरम्यान, इराणच्या केशम बेट, बंदर अब्बास आणि सीरिक शहरांमध्येही भीषण स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत.

### एसटीच्या बैठकीत जोरदार राडा

एसटी महामंडळानं, मंत्री महोदयांनी आमच्या आंदोलनानंतर बैठक बोलावली. मात्र, वेगळं ठरवून काही लोकांना बोलावण्यात आले, ५३ वरुन ५८ झाल्याचं सांगत टाळ्या वाजवा सांगून घरी जावा असं सांगितलं गेलं. अनेक विषय होते, पगारवाढ, घरभाडे, मागील थकलेली देणी. काही कामगारांना विनाकारण निलंबित करण्यात आलं होतं, अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला होता, यावर चर्चा व्हायला पाहिजे होती. पाठीमागच्या चर्चांवर कारवाई झालेली नाही. या सगळ्याला जबाबदार एमडी आहे. एमडी सुद्धा या भ्रष्टाचाराच्या गंगेत रोज अंघोळ करत असेल. भ्रष्टाचार करण्यासाठी असा माणूस बसवला असेल तर या बैठकीत कशाला बसायचं? त्याला हकलून लावा मग आम्ही बसतो अशी भूमिका आम्ही घेतली, असं सदाभाऊ खोत म्हणाले. मला वाटलं होतं की प्रताप सरनाईक यांच्यासारखा कणखर परिवहन मंत्री मिळाला, पण माझ्या लक्षात आलं की ते गटार गंगेचे, भ्रष्टाचाराचे साक्षीदार व्हायला लागले आहेत, याचं आम्हाला प्रचंड दु:ख आहे.

### शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या...

भीती होती की माझ्यासोबत बरेवाईट होईल. ही भीती असंख्य पालकांना वाटत असते. मला हेच सांगायचे आहे की तुमच्या मुला-मुलींना बोलण्यापासून थांबवू नका. जेलमध्ये मी जाईल, पण त्यांना बोलू द्या.

पुढे बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, जेव्हा मी हे सुरू केले यात तुमच्या सर्वांचा देखील राग होता. जंतर-मंतरवर जेव्हा मी गेलो तेव्हा ते पूर्ण भरले होते. तिथल्या पेक्ष जास्त कॉकरोच पुण्यात येतील असे मी म्हटले होते आणि ते झाले आहे. आम्ही काय मागत आहोत? विद्यार्थ्यांसोबत जो अन्याय झाला आहे त्यांची जिम्मेदारी घेतली पाहिजे. कधीपर्यंत बिनलाजाप्रमाणे खुर्चीवर बसून राहणार? जे आपले विश्वगुरु आहेत, जे महामानव आहेत, त्यांना मला प्रश्न विचारायचा आहे, तुमच्यासाठी हे विद्यार्थी महत्त्वाचे आहेत की तुमचा मंत्री? असा सवाल दिपके यांनी पंतप्रधान मोदी यांना उद्देशून विचारला.

अभिजीत दिपके म्हणाले, सोनम वांगचूक देशातील सर्वात चांगले एज्युकेशनिस्टया आहेत, त्यांना शिक्षा मंत्री करण्याच्या ऐवजी त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. तुरुंगात टाकायची गरज काय आहे? जर तुम्ही नीट काम केले असते तर मला अमेरिकेतून इथे यायची गरज पडली नसती.

### कुंभार समाजाला वर्षाला ७००...

मंत्र्यांनी राज्यातील सर्व तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना कडक आदेश दिले आहेत. महसूल विभागाकडून राज्यातील कुंभार कुटुंबांची अधिकृत नोंदणी केली जाणार असून, त्यांना एक विशेष ओळखपत्र दिले जाईल. महसूल विभागाच्या परवानग्या विनाविलंब आणि तात्काळ मिळाव्यात यासाठी एक खिडकी योजना सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कुंभार समाजाला दर्जेदार माती उपलब्ध करून देण्यासाठी संभाव्य जमिनींची माहिती गोळा करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. ही माहिती जिल्हा गौण खनिज आराखड्यात नमूद केली जाईल.

### सुनेत्रा पवारांच्या विमानात तांत्रिक...

विमान अपघातात मृत्यू झाला होता.

या पार्श्वभूमीवर माध्यमप्रतिनिधींनी सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या: 'सुनेत्रा वहिनी खरंच त्या विमानाने गेल्या होत्या की नाही, याची मला पूर्ण कल्पना नाही. पण जर असे झाले असेल आणि विमानामध्ये तांत्रिक बिघाड झाला असेल, तर तो अत्यंत चिंताजनक विषय आहे. मी नेहमीच कोणत्याही प्रवास साधनाच्या सुरक्षेबद्दल संसदेत सातत्याने आवाज उठवत असते. त्यामुळे मला वहिनींची आणि सोबत असलेल्यांची काळजी वाटणे स्वाभाविक आहे.'

सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'व्हीएसआर कंपनीबद्दल आरोपप्रत्यारोप होत राहतात. पण दोन-तीन महत्त्वाचे मुद्दे आहेत. सुनेत्रा वहिनी खरंच त्या विमानाने गेल्यात की नाही मला माहिती नाही. कारण पंतप्रधान मोदींनी कमी खर्चाचे आवाहन केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार अजुनही खासगी विमानाने किंवा हेलिकॉप्टरने प्रवास करते की नाही याची माहिती नाही,'

### ठाकरे गटातील अनेक जण..

पुन्हा फूट पडणार का? अशा चर्चा रंगू लागल्या आहेत.

राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनावर टीका करताना शिरसाट म्हणाले की, त्यांच्या आंदोलनाला आमचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही. मात्र, रोहित पवार केवळ स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचे काम करत आहेत, त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणात योग्य ती कारवाई करावी.

## पीएम सेतू योजना:औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण; रोजगारक्षम कौशल्यासाठी जिल्ह्यातील उद्योगांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री सेतू या योजनेअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण करुन रोजगारक्षम कौशल्य विकास करण्यात येणार आहे. त्यासाठी उद्योगांचा सहभाग घेतला जाणार आहे. जिल्ह्यातील पाच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची या योजनेसाठी निवड करण्यात आली असून सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होणार आहे. यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., सहसंचालक व्यवसाय शिक्षण प्रदीप दुर्गे, उपसंचालक रमण पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अभिजीत आलटे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार सत्यभूषण गोसावी आदी उपस्थित होते. पीएम सेतू ही केंद्र पुरस्कृत योजना असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण करुन त्यांचे आधुनिक, उद्योगाभिमुख व रोजगारक्षम कौशल्य संस्थांमध्ये रुपांतरीत करणे हा उद्देश आहे. त्यानुसार




जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर आणि पैठण,गंगापुर, फुलंब्री व खुलताबाद येथील आयटीआय अशा पाच संस्थांचे मिळून एक क्लस्टर विकसित केले जाणार आहे. या पाच आयटीआय मध्ये मिळून शिकणाऱ्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना या रोजगारक्षम कौशल्य विकास प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाचा ५० टक्के, राज्य शासनाचा ३३ टक्के व उद्योगांचा १७ टक्के निधी खर्च केला जाणार आहे. जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात विकसित करावयाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निवड झाली असून पुढील टप्प्यात उद्योगांचा सहभाग मिळविला जाणार आहे.

त्यासाठी एमआयडीसी, जिल्हा उद्योग केंद्र आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत संयुक्त प्रयत्न केले जातील.उद्योगांशी समन्वय तयार करुन उद्योगांना आवश्यक कौशल्यनुसार रोजगारक्षम अभ्यासक्रम तयार करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल,असे यावेळी सांगण्यात आले.

## विरंगुळा केंद्राबात ज्येष्ठ नागरिकांचे नगरसेविका अनिता काटे यांना निवेदन

पुणे दि.११ (प्रतिनिधी)- परिसरातील ज्येष्ठ नागरिक माझ्यासाठी नेहमीच मार्गदर्शक आहेत. त्यांचे हित जपण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणी सोडविणे हे माझे प्रथम कर्तव्य असून त्यांना विरंगुळा केंद्र मिळवून देण्यासाठी मी प्राधान्य देईन असे आश्वासन नगरसेविका अनिता काटे यांनी दिले. स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित होत असलेल्या पिंपळे सौदागर प्रभागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणी बाबत येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने प्रभागाच्या नगरसेविका अनिता काटे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. पिंपळे सौदागर परिसरात सद्यस्थितीत सहा ज्येष्ठ नागरिक संघटना कार्यरत असून महिला - पुरुष मिळून दिड हजारांपेक्षा जास्त सदस्यसंख्या आहे.



या सर्व संघटना ' पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाशी ' संलग्न असून महानगरपालिकेच्या वतीने या संघटनांना दरवर्षी विविध स्वरूपात भेटवस्तू मिळतात.

परंतु विरंगुळा केंद्र नसल्याने त्या ठेवायच्या कुठे हा प्रश्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांपुढे आहे. मनपाने दिलेल्या भेटवस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात एकत्र येऊन सुख दुःखाच्या चार गोष्टी करण्यासाठी विरंगुळा केंद्र उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच परिसरातील सांस्कृतिक चळवळ वाढीस लागण्यासाठी नाट्यगृहाची उभारणी करण्यात यावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार तसेच विवेकानंद लिगाडे, अशोक येळंमकर, सुभाष विधाते, रमेश चांडगे, सुभाष पाटील, अशोक कलाल, निर्मला कासार, भामिनी महाले, रमेश वाणी या पदाधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
**OLD NAME** - (1) MOHAMMED AZEEMODDIN SIDDIQUI
(2) SIDDIQUI MOHAMMAD AZEEMUDDIN
**NEW NAME** - MOHAMMED AZEEMUDDIN MOHAMMED YUSUFUDDIN SIDDIQUI
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS** - H. NO. 8-10-582, ARISH COLONY RAVINDRA NAGAR AURANGABAD MH.
**Affidavit no** - 82AB 296580